RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १०, अंक १८(२)] सोमवार, फेब्रुवारी २६, २०२४/फाल्गुन ७, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक २६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**उपविभागीय अधिकारी, पूर्व उपनगर, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडून,**

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि
पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ अंतर्गत.

**अधिसूचना**

क्रमांक एलएक्यू/एसआर/४४/२०२०.—ज्याअर्थी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७ (भाग-२)/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे ) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

**२**. ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, मुंबई उपनगर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे.) मध्य रेल्वेच्या "रेल्वे प्रवासी वाहतूक (सीएसएमटी ते कुर्ला या ५ वी व ६ वी रेल्वे मार्गीकेकरिता)" या सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश उक्त "सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. असे वाटते आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीअन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते का, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

**३**. ज्याअर्थी, सदर भूसंपादन प्रस्तावातील मिळकत ही उक्त सार्वजनिक प्रयोजनार्थ पायाभूत सुविधासाठी संपादन करण्यात येत असल्याने सदर प्रस्तावास **महाराष्ट्र शासन राजपत्र** दिनांक १६ नोव्हेबर २०२३ मधील कलम १० (क) अन्वये भूमी संपादन, पुनर्वसन

व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापुढे ज्याचा निर्देश उक्त "भूसंपादन कायदा" असा करण्यात आला आहे.) मधील प्रकरण क्रमांक २ व ३ मधील (कलम ४ ते १० मधील) तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे ;

**४.** आणि ज्याअर्थी, सदर जमिनीबाबत मा.उच्च न्यायालयामध्ये कंपनी पिटीशन नंबर ३८५/२००२ दाखल असून सदर जमिनीचा ताबा ऑफिशियल लिक्वेडेटर, उच्च न्यायालय यांच्याकडे असल्याने उप मुख्य अभियंता (निर्माण), सेंट्रल रेल्वे, दादर यांचेकडून मा.उच्च न्यायालयात सदर जमीन संपादनाची कार्यवाही सुरू करण्यासाठी परवानगी मिळण्याबाबत अंतरिम ॲप्लीकेशन एल नंबर १२२/२०२१ दाखल करण्यात आले होते. सदर अंतरिम ॲप्लीकेशन नं.१२२/२०२१ मध्ये दिनांक ५ जानेवारी २०२२ रोजी मा.उच्च न्यायालयाने कायद्यानुसार भूसंपादन कार्यवाही करण्यास कोणतीही आडकाठी नाही असे आदेश पारित केले आहेत ;

**५.** ज्याअर्थी, उप मुख्य अभियंता (निर्माण), सेंट्रल रेल्वे, दादर यांनी पत्र क्र.No.DR/DRG/5th & 6th line/CSMT-Kurla/ Land, दिनांक ८ ऑगस्ट २०२२ अन्वये सदर जमीन वादग्रस्त असल्याने थेट खरेदीने संपादनास विलंब लागत असल्याने सदर जमीन भूसंपादन अधिनियमानुसार कलम ११ अन्वये संपादन प्रक्रिया करण्याबाबत कळविले आहे. त्याअर्थी सदर भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे.

**६.** त्याअर्थी, आता असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही. परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल; परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही. तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे.) च्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे. आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, पूर्व उपनगर, मुंबई उपनगर जिल्हा, निळकंठ बिझनेस पार्क, 'ए' विंग, तळ मजला, किरोळ रोड, विद्याविहार (पश्चिम), मुंबई ४०० ०८६ यास पदनिर्देशित केले आहे.

**जमिनीचे वर्णन**

ता. कुर्ला, जिल्हा- मुंबई उपनगर

| अ.क्र. | गावाचे नाव | नगर भूमापन क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| १ | कुर्ला | ४७७ ब पैकी | ११.५८ |
| २ | | ४७७ इ पैकी | ६२७.६७ |
| ३ | | सडक | २२३२.०० |
| ४ | | २८१ पैकी | २१०.०० |
| ५ | | २८० | ४३.९० |
| ६ | | २७९ पैकी | २.४७ |
| | | **एकूण** | **३१२७.६२** |

**सार्वजनिक प्रयोजन** :- रेल्वे प्रवासी वाहतूक (सीएसएमटी ते कुर्ला या ५ वी व ६ वी रेल्वे मार्गीकेकरिता).

विद्याविहार, मुंबई,
दिनांक : २३ फेब्रुवारी २०२४.

**प्रकाश संकपाळ,**
उपविभागीय अधिकारी,
पूर्व उपनगर, मुंबई उपनगर जिल्हा.

## BY THE SUB DIVIDIONAL OFFICER, EASTERN SUBURBAN, MUMBAI SUBURBAN DISTRICT

UNDER SECTION 11 OF RIGHT TO FAIR COMPENSATION AND TRANSPARENCY IN LAND ACQUISITION, REHABILITATION AND RESETTLEMENT ACT, 2013.

*NOTIFICATION*

No. LAQ/SR/43/2020.—Whereas *vide* the Government Notification, Revenue and Forests Department, No. MIS-11/2014/C.R.77(PART-2)/A-2, dated the 11th January 2015 (hereinafter referred to as "the said notification" ) issued in exercise of the powers conferred by the proviso to clause (e) of Section 3 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013), has notified that in relation to acquisition of land in respect of a public purpose, as defined in clause (*za*) of Section 3 of the said Act, in a District for an area not exceeding 10,000 hectares, the Collector of such District shall be deemed to be the appropriate Government, for the purposes of the said Act;

2. Whereas, it appears to the Collector of Mumbai Suburban District being the appropriate Government in view of the said notification, that land more particularly described in schedule appended hereto (hereinafter referred to as "the said land"), is needed or likely to be needed for the public purpose of "Railway passenger transport (5th and 6th railway line from Mumbai CSMT to Kurla)" (hereinafter referred to as "the said public purpose"), and therefore, it is hereby notified under provisions of sub-section (*1*) of Section 11 of the said Act, that the said land is likely to be needed for the said public purpose;

3. Whereas, the land under this project is acquired for infrastructural facilities, this project is exempted from the application of provisions of Chapters 2 and 3 (from Section 4 to 10) of Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013. (Hereinafter referred as "the said Act") by Section 10 (A) of State Government Notification, dated 26th April 2018.

4. And whereas, company petition number 385 of 2002 has been filled at Honorable High Court Mumbai regarding the said land. The possession of the said land is with Official liquidator appointed by Honorable High Court and Deputy Chief Engineer (Construction), Central Railway, Dadar has filed application for the permission of Honorable High Court for acquisition of said Land by interim application number 122 of 2021. In the said interim application Honorable High Court has permitted the authority to acquire the said land as per law ;

**5.** And whereas, the Deputy Chief Engineer (Construction), Central Railway, Dadar *vide* letter No.DR/DRG/5th & 6th line/CSMT-Kurla/Land, dated 8th August 2022 as the said land is in dispute as the Acquisition is delayed by direct purchase. Therfore, it is requested to process the land acquisition for the subjected City Survey No's under compulsory Land acquisition process only and the notice may be revised accordingly under section 11. Accordingly, the process of land acquisition has been started.

6. And whereas, it is declared that as per sub-section (*4*) of Section 11 of the said act, no person shall make any transaction of said land or part thereof or create any encumbrances on said land from the date of publication of this Notification till such time as the proceeding under Chapter IV of the said Act are completed: Provided that, the Collector may, on the application made by the owner of the said land or part thereof exempt in special circumstances to be recorded in writing, such owner from the operation of the above provision: Provided further that, any loss or injury suffered by any person due to his wilful violation of this provision shall not be made up by the Collector. It is further declared that according to sub-section (*5*) of Section 11 of the said Act, the Collector is going to undertake and complete the exercise of updating of land records as prescribed by sub-rule (*3*) of rule 10 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) Rules, 2014 (hereinafter referred as the said Rules); And Whereas, under clause (*g*) of Section 3 of the said Act, the Collector being the appropriate Government is pleased to designate Sub Divisional Officer, Eastern Suburban, Mumbai Suburban District, Neelkanth Business Park, 'A' wing, Ground Floor, Kirol Road, Vidyavihar (West), Mumbai 400 086 to perform the functions of a Collector under the said Act.

**Description of land**

Tal. Kurla, District Mumbai Suburban

| Sr.No. | Village Name | CTS No. | Area (sq.m.) |
|---|---|---|---|
| 1 | Kurla | 477 B part | 11.58 |
| 2 | | 477 E part | 627.67 |
| 3 | | Sadak | 2232.00 |
| 4 | | 281 part | 2010.00 |
| 5 | | 280 | 43.90 |
| 6 | | 179 part | 2.47 |
| | | **Total** | **3127.62** |

Public Purpose: Acquisition for “Railway passenger transport (5th and 6th railway line from Mumbai CSMT to Kurla)”.

Vidyavihar, Mumbai,
dated : 23rd February 2024.

PRAKASH SANKPAL,
Sub Divisional Officer,
Eastern Suburban, Mumbai Suburban District.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.